नारपोली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

| महाराष्ट्र पोलीस | पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
|---|---|---|

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसुचना/ ३६ /२०२५ दि. ०४/०३/२०२५

## –:वाहतूक नियंत्रण अधिसुचना:–

**ज्याअर्थी,** नारपोली वाहतूक उप विभागाचे हद्दीत दिनांक ०५/०३/२०२५ रोजी सकाळी ०८:०० वा. ते सायंकाळी १७:०० वा. पावेतो श्री. कपिल पाटील माजी खासदार यांचा वाढदिवस असल्याने सदर दिवशी मा. मुख्यमंत्री, म.रा.मुंबई व इतर मंत्री महोदय् तसेच आजुबाजुच्या परिसरातुन जनसमुदाय मोठया संखेने नारपोली वाहतूक उप विभागच्या हद्दीतील ग्रॅान्ड विस्टा हॉटेल, बॉम्बे ढाब्याजवळ, दिवे अंजुरगाव, मुंबई नाशिक हायवे भिवंडी व नारपोली स्टेडीयम तसेच त्यांचे निवासस्थान मोरेश्वर बंगला, दिवे अंजुरगाव या ठिकाणी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** नाशिक कडुन ठाणे/नवी मुंबई माणकोली मार्गे तसेच गुजरात कडुन चिंचोटी नाका – आंजुरफाटा – ठाणे/नवी मुंबई माणकोली मार्गे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **रांजनोली नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**प्रवेश बंद –** गुजरात कडुन नवी मंबई/ठाणे शहरात जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड – अवजड मालवाहतुक करणाऱ्या वाहनांना **चिंचोटी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

सदरची अधिसुचना दि. ०५/०३/२०२५ रोजी सकाळी ०९.०० ते रात्रौ २२.०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण.
मा. आयुक्त, भिवंडी निजामपूरा शहर महानगरपालिका, भिवंडी/बृहन्मुंबई
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२/वि.शा.ठाणे.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, भिवंडी

CamScanner

विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी/ठाणे.

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, भिवंडी व पो.निरी. भिवंडी, नारपोली, कोनगांव वाहतूक उपविभाग ठाणे.

CamScanner